NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

TARUN BHARAT, Goa, 15.12.2023
Page No. 3, Size:(16.89)cms X (5.97)cms.

**Bullet train project continues uninterrupted; Follow the rules too**

# बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम अखंडपणे सुरू; नियमांचेही पालन

**मुंबई, दि. १४ : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वाढत्या प्रदूषणामुळे बंद करण्याच्या सूचना दिल्याची माहिती समोर आली होती. मात्र, तयात तथ्य नसून प्रदूषण नियमांचे पालन करून प्रकल्पाचे काम 'बीकेसी'मध्ये सुरूच असल्याची माहिती 'नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड' (एनएचएसआरसीएल) ने दिली आहे.

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प मार्गात मुंबईतील स्थानक हे एकमेव भूमिगत स्थानक आहे. बीकेसी स्थानक बांधण्यासाठी सुमारे ४.८ हेक्टर जमीन आवश्यक आहे. प्लॅटफॉर्म जमिनीपासून सुमारे २४ मीटर खोलीवर नियोजित आहे. प्लॅटफॉर्म, कॉन्कोर्स आणि सर्व्हिस फ्लोअर असे तीन मजले असतील. स्थानकावर सहा प्लॅटफॉर्म असतील आणि प्रत्येक प्लॅटफॉर्मची लांबी अंदाजे आहे. ४१५ मीटर म्हणजेच १६ डब्यांची बुलेट ट्रेन बसण्यासाठी पुरेशी असेल. या स्थानकाला मेट्रो स्थानक आणि रस्त्याची जोडणी असेल. मेट्रो लाईन २बीच्या स्थानकाकडे आणि एमटीएनएल इमारतीकडे जाण्यासाठी दोन प्रवेश आणि निकस पॉइंट्सचे नियोजन केले आहे.



'सीसीटीव्ही'द्वारे साईटवर बारकाईने निरीक्षण. अंतर्गत आणि लगतच्या रस्त्यांची

'एनएचएसआरसीएल' मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन करते आहे. कोणत्याही नियमांचे उल्लंघन न करता मुंबई हायस्पीड रेल्वे स्थानकाचे बांधकाम मुंबईतील बीकेसी येथे सुरू आहे. 'एनएचएसआरसीएल'कडून धूळ नियंत्रणासाठी सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत. कंस्ट्रक्शनची सर्व कामे सुरू असून काम बंद नसल्याची माहितीही 'एनएचएसआरसीएल'ने दिली आहे.

नियमितपणे सफाई केली जात असून दिवसातून तीन वेळा टँकर वापरून पाणी शिंपडले जाते. आवश्यकतेनुसार पाणी शिंपडण्याची वारंवारता वाढते तसेच प्रदूषक पातळीचे निरीक्षण करण्यासाठी साईटवर सतत हवेचे निरीक्षण केले जाते. स्थळापासून बाहेरील आवारात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होऊ नये म्हणून प्रकल्पाच्या जागेला सर्व बाजूंने प्रकल्प स्थळाच्या बाहेरील आवारात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होऊ नये म्हणून प्रकल्पाच्या जागेला सर्व बाजूंनी बॅरिकेटिंग करण्यात आले असल्याचे 'एनएचएसआरसीएल'ने स्पष्ट केले आहे.

## धूळ नियंत्रणासाठी प्रकल्प स्थानावर उपाययोजना

मिस्ट गनच्या साहाय्याने उडणारे धुळीचे कण यशस्वीरित्या हवेत पसरण्यापासून रोखले जातात. मिस्ट गनचा वापर लगतच्या रस्त्यावरही केला जात आहे. धूळ उत्सर्जन टाळण्यासाठी कच्चा माल आणि टाकाऊ माल ताडपत्री आणि हिरव्या जाळीने बंद करण्यात आला आहे. साहित्य वाहून नेणारे डंपर ताडपत्रीने बंद केले जातील याची खात्री केली जाते जेणेकरून प्रवास करताना धूळ उत्सर्जित होणार नाही. साईटवर व्हील वॉश सुविधा प्रदान केली आहे. जेणेकरून वाहनांच्या टायर आणि चाकांतून धूळ वाहून जाणे टाळले जाते, अशी माहिती 'एनएचएसआरसीएल'कडून देण्यात आली.